# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २८६- २३** **दिनांक :- २९/०८/२०२३.**

## मोबाईलची चोरी करणाऱ्यास अटक करुन चोरीचे अनेक मोबाईल हस्तगत, काशिमिरा पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण पथकाची कामगीरी

काशिमिरा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी नामे श्री मनोहर शिवराम काजरेकर रा-घोडबंदर रोड, कासारवडवली, ठाणे यांचा दि.२५/०८/२०२३ रोजी सायंकाळी १७.०५ वा चे सुमारास फाउंटन सिग्नल येथील बसस्टॉप वरुन बसमध्ये बसत असताना त्यांचा खिशातील काळया रंगाचा रेडमी नोट-०७ एस किंमत अंदाजे रुपये-५०००/-मोबाईल फोन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे गु.र.नं. ६१०/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तपास सुरु केला असता, तपासादरम्यान फोनबाबत तांत्रिक तपास करुन नमुद गुन्हयात इसम नामे जुबेर जाफर कच्ची वय-२४ वर्षे, धंदा-बिगारीकाम रा-राबोडी, ठाणे यास घोडबंदर रोड येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याचा सदर गुन्हा त्याने केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्याला दि.२६/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपी याचाकडे पोलीस कोठडी दरम्यान आरोपी याचाकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्याने फिर्यादी यांचा चोरी केलेला रेडमी नोट-०७ एस मोबाईल फोन, आरोपी स्वत वापरत असलेला मोबाईल व इतर वेगवेगळया कंपनीचे १० असे एकुन-१२ मोबाईल फोन किं अं रुपये-५९,०००/- एवढयाची मालमत्ता आरोपी याचे राहते घरातुन हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, यांचा मार्गदर्शनाखाली संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, समीर शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स.पो.नि.योगेश काळे, पो.उप.निरी.शिवाजी खाडे, स.फौ.अनिल पवार, पो.हवा. दिपक बारे, प्रताप पाचुंदे, अक्षय पाटील, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, स्वप्निल मोहीले, निकम, पो.अं. रवी कांबळे, प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी यांनी केलेली आहे.